CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
Regd. Office: Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
Head Office: CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294; email: ratambepriya@gmail.com

**दि. ०१.१२.२०२०**

**सिडको मलनि:सारण केंद्रातून पुनर्प्रक्रिया केलेले पाणी तळोजा औद्योगिक क्षेत्राला पुरविण्याचे नियोजन प्रस्तावित, पिण्यायोग्य पाण्याची होणार बचत**

सिडकोच्या नवी मुंबईतील कळंबोली येथील नियोजित मलनि:सारण पुनर्प्रक्रिया केंद्रातून ३० दशलक्ष लीटर पाणी तळोजा औद्योगिक क्षेत्रातील कंपन्यांना पुरविण्याचे नियोजन सिडकोतर्फे प्रस्तावित आहे. यामुळे तितक्याच प्रमाणात पिण्यायोग्य अशा स्वच्छ पाण्याची बचत होणार आहे.

सिडकोचे कळंबोली येथे ५० द.ल. लीटर क्षमतेचे मलनि:सारण केंद्र कार्यान्वित असून या केंद्रातून दररोज किमान २० ते २५ द.ल. लीटर सांडपाणी गोळा करून त्यावर प्रक्रिया केली जाते. तसेच कामोठे येथील मलनि:सारण केंद्रामध्ये दररोज कमीत कमी २० ते २५ द.ल. लीटर सांडपाण्यावर प्रक्रिया केली जाते. कळंबोली आणि कामोठे येथील मलनि:सारण केंद्रांमधून अंदाजे ४५ द.ल. लीटर सांडपाणी हे कळंबोली येथील नियोजित मलनि:सारण पुनर्प्रक्रिया केंद्र (टी.टी.पी.) येथे गोळा केले जाणार आहे. त्यानंतर पुनर्प्रक्रिया केंद्रामध्ये ४१ द.ल. लीटर पाण्यावर पुनर्प्रक्रिया केली जाऊन त्याद्वारे मिळणारे ३० द.ल. लीटर पाणी पुनर्वापरासाठी तळोजा औद्योगिक क्षेत्रातील कंपन्यांना पुरविले जाणार आहे.

**“सर्वत्र जगभर पाण्याचा पुनर्वापर करण्यावर भर दिला जात असताना अशाप्रकारे सांडपाण्यावर पुनर्प्रक्रिया करून त्याचा पुनर्वापर करण्यासाठी सिडकोतर्फे करण्यात येणारे प्रयत्न हे पाणी बचत व पर्यावरणाच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरणारे आहेत” असे मत सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजय मुखर्जी यांनी व्यक्त केले आहे.**

सदर मलनि:सारण पुनर्प्रक्रिया प्रकल्पासाठी होणारा अंदाजित खर्च काढण्यासाठी सिडकोतर्फे तांत्रिक सल्लागार नेमण्यात आला असून या सल्लागाराने व्यवहार्यता अहवाल सादर केला आहे. यामध्ये कळंबोली मलनि:सारण केंद्राचे अपग्रेडेशन, नवीन मलनि:सारण पुनर्प्रक्रिया केंद्र बांधण्यासाठी येणार खर्च, मलनि:सारण पुनर्प्रक्रिया केंद्रापासून तळोजा औद्योगिक क्षेत्रापर्यंत पाणी वाहून नेण्यासाठी जलवाहिन्या टाकण्याचा खर्च, पुढील २० वर्षे देखभाल व दुरुस्तीचा खर्च, पनवेल महानगरपालिकेला द्यावे लागणारे शुल्क व इतर प्रशासकीय खर्च यांबद्दलच्या व्यवहार्यतेची तपासणी केली आहे. सदर मलनि:सारण पुनर्प्रक्रिया केंद्र सन २०२१ या वर्षात विकसित करण्याचे नियोजित आहे.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

मा. संपादक महोदय,
वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.

**जनसंपर्क विभाग, सिडको**